श्री.प्र.शि.कोल्हे, कार्यकारी अभियंता यांच्या सेवा वर्ग करण्याबाबत तसेच, उप अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ हे पद तात्पुरत्या स्वरुपात मुख्य अभियंता (वि.प्र.), जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयात वर्ग करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग**

शासन निर्णय क्र.एलटीएस-१११४/(२३/२०१४)/आ.(वर्ग-१)

गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१

दि. ०७ जून, २०१४.

**वाचा:-** वित्त विभाग, शासन निर्णय क्र.१०९२/सीआर/८०६/व्यय-६, दि.१५.१०.१९९२.

**शासन निर्णय :-**

अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे अंतर्गत ई-जलसेवा प्रकल्पाच्या कामकाजासाठी श्री.प्र.शि.कोल्हे, सहायक मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), जलसंपदा विभाग, अमरावती यांच्या सेवा शासन मान्यतेने पुढील आदेश होईपर्यंत उसनवार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करण्यात येत आहेत. श्री.कोल्हे यांना अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते सहायक मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), जलसंपदा विभाग, अमरावती या पदावर काढण्यात यावेत.

२. श्री.कोल्हे यांच्या उपरोक्त प्रमाणे सेवा वर्ग केल्यामुळे, मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयातील सहायक मुख्य अभियंता पदाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी "उप अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ" हे पद तात्पुरत्या स्वरुपात मुख्य अभियंता (वि.प्र.), जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयाकडे वर्ग करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर आदेश वित्त विभागाच्या दि.१५.१०.१९९२ च्या शासन निर्णयान्वये पाटबंधारे विभागाच्या नियंत्रणाखालील विभाग / उप विभाग / शाखा या आस्थापनांची फिरवाफिरव करण्यास जलसंपदा विभागास दिलेल्या अधिकारानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ.माधव वीर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

E:\Dr.Veer_Saheb\E_02.11.2012\Dr. Veer Saheb\2013\Note_Kolhe_EE.doc

२. प्रधान सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर.
४. मुख्य अभियंता (वि.प्र.), जलसंपदा विभाग, अमरावती.
५. मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग, अमरावती.
६. मुख्य अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प, पुणे.
७. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), २-नागपूर
८. अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे.
९. अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ.
१०. उप अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ
११. श्री.प्र.शि.कोल्हे, सहायक मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), जलसंपदा विभाग, अमरावती यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१२. अवर सचिव (क्षेप्र) / कार्यासन आ.(प्रशि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. आ.(व[illegible]), संग्रहार्थ.